भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३१४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यलय, भंडारा
दिनांक २०/०६/२०१८

**१) सोन्या–चांदीचे दागीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक १९+२०/०६/२०१८ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी व दयाराम लालाजी गायधने आणी मुरलीधर गोविंदा हेमणे सर्व रा. भावड यांचे एकुण ३ घराचे कोणीतरी अज्ञात चोराने मागील दारवाजे तोडुन घरात प्रवेश करून घरातील टिनाची व लाकडी आलमारीतील ४ सोन्याच्या बिऱ्या ४ ग्रॅम ,सोन्याचे ३ लॉकेट ६ ग्रॅम, १ सोन्याचा मुखळा १० ग्रॅम, सोन्याची गळसोली ७.५ ग्रॅम, सोन्याची अंगठी ४ ग्रॅम, सोन्याचा मंगळसुत्र १० ग्रॅम, सोन्याची नथ ४ ग्रॅम, सोन्याचा लॉकेट ४ ग्रॅम, सोन्याच्या रिंग ६ ग्रॅम, सोन्याचे लॉकेट ५ ग्रॅम, सोन्याचे चार बार मुंदया २ ग्रॅम व ५ जोड चांदीच्या पायपट्टया २५ तोळे असे सोन्या व चांदीचे दागीने कि. १,०९,५००/रु. चा माल व नगदी ५८,५००/रु. असा एकुण १,६८,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी संतोष भगीर माहुरे वय ४२ वर्ष रा. भावड यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४५७,३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.पो.नी. किचक पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**२) मोटार पंपची चोरी :–**

दिनांक १८+१९/०६/२०१८ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादीच्या शेताला पाणी देण्याकरीता सांड नाल्यावर लावलेली २ एचपी टेक्सो कंपनीची मोटार पंप क्र. ६०१०७०१०६०७ कि. ७,०००/रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी वामन रामाजी ठोंबरे वय ५४ वर्ष राजेदहेगांव यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) लाचेची मागनी केंल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २०/०६/२०१८ चे १८.२६ वाजता दरम्यान यातील आरोपी यांने तक्रारदार राहुल राऊत यांना त्याचे मित्राचे अवैद्य वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करण्याकरीता प्रती महीना प्रत्येक ट्रॅक्टरचे २,०००/रु. असे एकुण ४,०००/रु. ची प्रती महीना तसेच तक्रारी यांचे आज रोजी अवैध वाहतुक करीत असतांना पकडलेल्या ट्रॅक्टर वर कोणत्याही प्रकारीची कार्यवाही केली नाही म्हणुन ५,०००/रु. त्याच्या मोबदला असे एकुण ९,०००/रु. लाचेची मागनी करून प्रत्यक्ष सापळा कार्यवाही वेळी ६,०००/रु. लाच रक्कम स्विकारतांना तसेच कोणत्याही प्रकारचा प्रतीकार न करता स्विकारल्याने सरतर्फे फिर्यादी पोनि. पारधी ला.प्र.का. भंडारा याचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ७,१३,(१)(ड),१३(२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. पारधी एसीबी भंडारा पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**४) एसटी बसला धडक मारून नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०/०६/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे त्याचे ताब्यातील बस क्र. एमएच ४० एन ४९९६ चे गाडी मध्ये वाहकासह प्रवासी बसवुन तिरोडा ते माहुर जात असतांनी जेसीबी केस ७९० च्या चालकाने निष्काळजीपणे अचानक रस्त्याचे मधोमध आणुन बसचे वाहक साईडचे मागचे काचाजवळ जेसीबी समोरील बसला धडक देवुन टिनाचे पत्रे तुटुन, चेपकुन पडुन अंदाजे ४००/रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी मंगल यादोराव उके वय ४३ वर्ष रा. गंगाझरी जि. गोंदिया धंदा. म.परी यांचे तोडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**५)महिलेचा जळाल्याने उपचारा दरम्यान मृत्यु :–**

दिनांक १४/०६/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. प्रिती मुरलीधर ऊईके वय ३२ वर्ष, रा. कवलेवाडा ही दिनांक १४/०६/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान आपले घरी गॅस शेगडीवर स्वयपांक करित असतांना गॅस शेगडीचे वर लाकडी पाटीवर ठवेलेला तुरीचे दाळीचा डब्बा काळीत असता गैस शेगडीवर साडीचा पदर पडून पेटुन चेहऱ्याला, गळयाला, छातीला, दोन्ही हाताला जवळल्याने सामान्य रुग्नालय भंडारा येथे वार्ड क्र. १९ मध्ये उपचार सुरु असतांना मरण पावल्याने फिर्यादी मुरलीधर चत्रृघन ऊईके वय ३२ वर्ष, रा. कवलेवाडा यांच तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

५) विषारी औषध प्राशन करुन उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :-

दिनांक १९/०६/२०१८ चे १६.४० वाजता दरम्यान यातील मृतक देवचंद दयाराम येरणे वय ६५ वर्ष, रा. दिघोरी याने पायझनींग प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा आयसीयु विभागात दिनांक १५/०६/२०१८ चे १५.३० वाजता भरती केले असता उपचारा दरम्यान १९/०६/२०१८ चे १६.४० वाजता मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. पुराम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला पुढील तपास पोना. अरकासे हे करीत आहेत.

६) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :-

दिनांक २०/०६/२०१८ चे १९.१० ते २०.१० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मारोती अल्टो गाडी ही बावनकर चौक तुमसर येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभी करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. गयगये यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गयगये पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :-

दिनांक २०/०६/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोअर आटो वाहन गाडी ही अडयाळ बस स्थानक येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभी करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बोरकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बोरकर पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत.

८) अवैध देशी,विदेशी, हातभट्टी दारु अडड्यांवर धाडी . :-

दिनांक १९/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा व साकोली येथे अवैध देशी, विदेशी, हातभट्टी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २० लिटर हातभंट्टी दारू किंमती २०००/–रु. तसेच ५ लिटर २२० मिली लिटर देशी/विदेशी दारु किंमती १५,१४५/–रु. असा एकुण किंमती ३,५,४५/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-

दिनांक १९/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०२ तीन सिटर वाहनाकरीता– ११ ईतर वाहनांवरती – १९ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिति कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.